## सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील धोरण

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय, क्र. नाहप्र २००९ /(६६३ /०९)/माशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- ०७ ऑगस्ट २००९.

**शासन निर्णय :-**

सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळा राज्यामध्ये सुरु करावयाची असल्यास संबंधित अभ्यासमंडळाच्या बायलॉजमध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य शासनामार्फत सदर शाळेस ना हरकत प्रमाणपत्र दिले जाते. देशातील इतर राज्यांमध्ये सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन राज्यातील सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळाना दिल्या जाणाऱ्या ना हरकत प्रमाणपत्रांमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर शासन निर्णयान्वये सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळाना द्यावयाच्या ना हरकत प्रमाणपत्रा संदर्भातील धोरण पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे:-

१) ना हरकत प्रमाणपत्र हे तीन वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात येईल. प्रत्येक तीन वर्षांनी ना हरकत प्रमाणपत्राचे नूतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील. यापूर्वी देण्यात आलेल्या ना हरकत प्रमाणपत्रांच्या बाबतीत देखील ज्या शाळांना ना हरकत प्रमाणपत्र देऊन तीन वर्षांचा कालावधी पूर्ण झालेला आहे अशा शाळांनी पुन्हा ना हरकत प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी अर्ज करणे आवश्यक राहील. प्रथमत: दिले जाणारे ना हरकत प्रमाणपत्र हे शासन स्तरावरुन दिले जाईल. प्रत्येक तीन वर्षानंतर ना हरकत प्रमाणपत्राचे नूतनीकरण हे संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या स्तरावरुन करण्यात येईल. नूतनीकरण करताना तपासायच्या बाबींसंदर्भात स्वतंत्रपणे सूचना संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांना कळविण्यात येतील.

२) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळा सुरु करण्यास दिलेले ना हरकत प्रमाणपत्र कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय काढून घेण्याचा अधिकार राज्य शासनास राहील. तसेच राज्य शासनाने दिलेल्या निर्देशांची सीबीएसई/ आयसीएसई/ आयबी अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांनी पूर्तता न केल्यास सदर ना हरकत प्रमाणपत्र कोणतेही कारण दिल्याशिवाय काढून घेण्याचे अधिकारदेखील राज्य शासनास राहतील.

३) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळातील विद्यार्थ्यांचे प्रवेश, बोनाफाईड जन्मपत्राच्या दाखल्यावर करण्यात यावेत.

४)सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांतर्फे राज्य शासनातर्फे शुल्क निर्धारण समितीने निर्धारित केलेले शुल्क आकारले जावे.

Scanned with OKEN Scanner

सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळातील वर्गामध्ये विद्यार्थीक्षमता विहित नियमांप्रमाणेच राहील.

६) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांनी इ.१ ते ५ वीपर्यंत राज्य मंडळाचा इंग्रजी माध्यमाकरिता असलेला अभ्यासक्रम राबविणे बंधनकारक राहील. ज्या शाळांमध्ये राज्य मंडळाचा इंग्रजी माध्यमाकरिता असलेला अभ्यासक्रम इ. १ ते ५ वीपर्यंत राबविला जात नाही त्या शाळांनी राज्यमंडळाचा अभ्यासक्रम पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०१०-११) राबविणे अनिवार्य राहील.

७) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळेमध्ये इ. ८ वीपर्यंत त्रिभाषा सूत्र पाळले जावे. मराठी भाषा ही द्वितीय भाषा म्हणून शिकविली जावी.

८) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांचे व्यवस्थापन ज्यावेळी विविध पदांमध्ये उमेदवारांची नियुक्ती करतेवेळी उपस्थित राहण्याकरिता जिल्हा शिक्षणाधिकारी अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या सदस्याला व्यवस्थापनाने आमंत्रित करणे आवश्यक राहील.

९) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन शासनाने निर्धारित केलेल्या वेतननियमानुसार असावे.

१०) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनातर्फे कोणत्याही प्रकारच्या देणग्या विद्यार्थी अथवा पालकांकडून घेण्यात येणार नाहीत.

११) सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांतर्फे प्रॉव्हीडंट फंडची योजना कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात यावी.

१२)सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांतील विद्यार्थी काही कारणास्तव शाळा सोडून अन्य शाळेत प्रवेश घेऊ इच्छित असेल तर अशा कोणत्याही विद्यार्थ्यावर त्याच शाळेमध्ये शिक्षण घेण्याबाबतची सक्ती केली जाऊ नये.

१३) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांतील सुरु असलेले वर्ग व विद्यार्थीसंख्येची माहिती संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये दि. ३१ ऑगस्टपूर्वी सादर करणे आवश्यक राहील.

१४) सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांतील प्रत्येक वर्ग वाढीस संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

१५) सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांनी ट्रॅफीक सेफ्टी गाईड लाईन्सची (पोलीस, अग्निशमन व वाहतुक विभाग यांनी निर्धारित केल्यानुसार ) काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१६) सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनानी फायर प्रोटेक्शन ॲरेंजमेंट (नॅशनल बिल्डींग कोड ऑफ इंडिया पार्ट-४ फायर प्रोटेक्शन १९९७ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा ) संदर्भात नियमानुसार व्यवस्था करणे आवश्यक राहील.

१७) सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांना राज्य शासनाचे सर्व नियम कायदे व आदेश यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१८) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळा या संपूर्णत: व्यवस्थापनांतर्फे स्वयंनिधीतून चालविल्या जातील व शासनाकडून त्यांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

१९) शासनातर्फे दिले जाणारे ना हरकत प्रमाणपत्र इ. १२ वी पर्यंत लागू राहील.

Scanned with OKEN Scanner

२०) शासनाने मागितलेली कोणतीही माहिती सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई मंडळाशी संलग्नित शाळांनी देणे बंधनकारक राहील. तसेच या शाळांची शैक्षणिक/लेखाविषयक तपासणी करण्याचे अधिकारदेखील राज्यशासनास राहतील.

सदर शासन निर्णयातील तरतुदी शासन स्तरावरुन सीबीएसई/आयसीएसई/आयबी/ आयजीसीएसई/ सीआयई मंडळांच्या अभ्यास मंडळांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत. तसेच या शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या उपरोक्त सर्व तरतुदीचे पालन राज्यातील सर्व सीबीएसई/ आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांनी करणे बंधनकारक आहे. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळा सुरु करावयाची असल्यास संलग्निकरणासाठी जी कागदपत्रे आवश्यक आहेत ती सर्व कागदपत्रे राज्य शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेताना सादर करणे बंधनकारक राहील. आवश्यक कागदपत्रांची यादी संबंधित मंडळांच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. ज्या शाळा संबंधित मंडळांच्या संलग्नतेसंदर्भातील नियमांची, अटी शर्तींची पूर्तता करणार नाही अशा शाळांचे ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २००९०८०७१३०९३५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ. सुवर्णा सि. खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषदा
सर्व शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण), बृहन्मुंबई
मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव.
मा.मंत्री (शालेय शिक्षण)यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
मा. सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सहायक.
माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई, सदर शासन निर्णयातील तरतूदी प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह.
शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील कार्यासन अधिकारी-प्राशि-३/उमाशि-१/माशि-२
निवड नस्ती माशि-१

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

७७५

क्रमांक- नाहप्र २०१३/(७५/१३)माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ जून, २०१३.

प्रति,

शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :-** सीबीएसई/आयसीएसई शाळांना देण्यात आलेल्या नाहरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरणाबाबत.

**संदर्भ :-** १. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचे क्र.प्राथ२/कोवि/नशापप्र/१२/१९७०२-१४, दि.२८/०३/२०१३ चे पत्र

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचे क्र.प्राथ २/कोवि/नशापप्र/१२/२५०६३-६४, दि.७/०५/२०१३ चे पत्र

३. विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचे क्र.प्राथ/व/३२५०/२०१३, दि.३० मार्च, २०१३

वरील विषयावरील संदर्भाधीन क्र.१ ते३ पत्रे कृपया पहावीत.

२. शासन निर्णय क्र.नाहप्र २००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक ७/०८/२००९ अन्वये सी.बी.एस.ई./आय.सी.एस.ई. इत्यादी अभ्यासक्रमासाठी संबंधित मंडळाच्या संलग्नतेसाठी राज्यातील विविध संस्थांना शासन स्तरावरुन थेट ना-हरकत प्रमाणपत्रे देण्यात येत होती.

३. थेट ना हरकत प्रमाणपत्रे प्राप्त झालेल्या संस्थानी परस्पर शाळा सुरु केल्या आहेत. त्यामुळे ज्या शाळांना तात्पुरत्या स्वरुपात ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे त्या शाळा तीन वर्षाच्या कालावधीनंतर ना हरकत प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी आलेल्या आहेत, या शाळांना तसेच यापूर्वी ज्या शाळांना कायमस्वरुपी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे अशा शाळांच्या बाबतीत त्यांना शासन स्तरावरुन मान्यता देण्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे.



Scanned with OKEN Scanner

सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात. तसेच, त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा. जेणे करुन अशा शाळांना शासन स्तरावरुन ना हरकत प्रमाणपत्र देण्याची पुढील कार्यवाही करता येणे शक्य होईल.

(सु.न. जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-**

१. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
नागपूर/अमरावती/नाशिक/पुणे/मुंबई/औरंगाबाद/कोल्हापूर
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सर्व जिल्हा परिषदा
३. मा.मंत्री/राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
४. मा.अपर मुख्य सचिव यांचे स्वी.स.
५. निवडनस्ती/माशि-१

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

क्रमांक- नाहप्र २०१३/(७५/१३)माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०२ ऑगस्ट, २०१३

Faelani International School
Affiliation No:- 1130044
School Code :- 30253

प्रति,

शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय :- सीबीएसई/आयसीएसई /आयबी / आयजीसीएसई इत्यादी देशातील व विदेशातील अभ्यासक्रमांशी संलग्नित होणा-या शाळांचे नाहरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्याबाबत.

संदर्भ :- समक्रमांकाचे दि.१९ जून, २०१३ चे पत्र

वरील विषयावरील संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

२. संदर्भाधीन पत्रान्वये सीबीएसई/आयसीएसई /आयबी / आयजीसीएसई इत्यादी देशातील व विदेशातील अभ्यासक्रमांशी संलग्नित होणा-या शाळांच्या संदर्भातील मान्यता / ना-हरकत प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने करावयाच्य कार्यवाहीबाबतच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

उपरोक्त संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने येथे स्पष्ट करण्यात येते की, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ या अधिनियमांमधील तरतूदी विचारात घेता यापूर्वी शासनस्तरावरुन तात्पुरत्या व कायमस्वरुपी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या व सद्य:स्थितीत शासन परवानगीशिवाय सुरु असलेल्या विवक्षित शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १८ व १९ च्या अनुषंगाने विहित केलेले निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असतील तर अशा शाळांना शासन स्तरावरुन परवानगी आहे असे गृहित धरुन मान्यता देण्याची कार्यवाही संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावरुन करण्याबाबतच्या



Scanned with OKEN Scanner

४. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ संपूर्ण देशासाठी दिनांक ०१ एप्रिल, २०१० पासून अंमलात आला आहे. या अधिनियमामधील तरतूदी विचारात घेता यापूर्वी शासनस्तरावरुन तात्पुरत्या व कायमस्वरुपी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या व सद्यस्थितीत शासन मान्यतेशिवाय सुरु असलेल्या विवक्षित शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १८ व १९ च्या अनुषंगाने विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करतात किंवा कसे याबाबतची पडताळणी संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी करणे आवश्यक राहील. जर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असतील तर त्यानुसार प्राप्त होणा-या मान्यतेच्या / अहवालाच्या अनुषंगाने अशा शाळांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची पुढील कार्यवाही शासनस्तवरावरुन करणे शक्य होईल. याबाबतच्या उपरोक्त सूचना सर्व संबंधितांना आपल्यामार्फत कळविण्यात याव्यात.

(सु.न. जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-**

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
नागपूर/अमरावती/नाशिक/पुणे/मुंबई/औरंगाबाद/कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner

2006-1

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

NO.NOC 1005/( 836/2005)/SE-1
School Education& Sports Department,
Mantralaya, Annexe,
Mumbai-400 032.
Date: 10/03/2006

To,
The Secretary,
Central Board of Secondary Education,
Community Center, Preet Vihar,
New Delhi.

Subject: Issue of No objection Certificate

Sir,

Government of Maharashtra has No Objection for starting a school in C.B.S.E. At .Takve village, Taluka Maval, Dist. Pune run by Aishabai & Haji Abdul Latif Charitabal Trust,Nirmal Bldg, 21st Floor, Nariman Point, Mubai -400 021 affiliate to the Council for the Indian School Certificate Examination,on the condition that the school shall abide by the rules and regulations stipulated in that behalf by the State Government.

Yours faithfully,

( N.G.TADAVI )
Desk Officer
Government of Maharashtra

Copy to:
1. Director of Education, Maharashtra State, Pune
2. The Deputy Director of Education, ~~Amravati~~ . PUNE
3. Education Officer (Secondary), Z.P. ~~Akola~~. PUNE
4. Managing Trustee,Aishabai & Haji Abdul Latif Charitabal Trust,Nirmal Bldg, 21st Floor, Nariman Point, Mubai -400 021
5. S.F. SE-1



Scanned with OKEN Scanner

Fazlani International School
Affiliation No.- 1130311
School Code :- 30253

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

NO.NOC 2005/(836 /2005)/SE-1
School Education & Sports Department,
Mantralaya, Annexe,Mumbai-400 032.
Date:- 13/02/ 2007.

To,
The Secretary,
Central Board of Secondary Education,
Community Centre, Preet Vihar,
New Delhi - 110 092

Subject : Issue of No objection Certificate

Sir,

The Government Of Maharashtra has No Objection for starting a school in C.B.S.E.section at Takve village, Taluka Maval, Dist, Pune run by Aishabai & Haji Abdul Latif Charitabal Trust, Nirmal Bldg, 21st Floor, Nariman Point, Mumbai-400021 affiliat to the Central Board of secondary education the condition that the school shall abide itself by the rules and reglations stipulated in that behalf by the State Government.

Yours faithfully,
SSKharat

( S.S.Kharat )
Under Secretary,
Government of Maharashtra

Copy to:
1. Director of Education (Secondary and Higher Secondary), Maharashtra State, Pune
2. The Deputy Director of Education,Pune.
3. Education Officer (Secondary), Z.P. Pune.
4. The Managing Trustee, Aishabai & Haji Abdul Latif Charitabal Trust, Nirmal Bldg, 21st Floor, Nariman Point, Mumbai-400021.
5. S.F. SE-1

C:\Documents and Settings\rane\My Documents\MASHI 1\NOCsss\FINAL NOC

Scanned with OKEN Scanner

Fazlani International School
Affiliation No.- 1130311
School Code :- 30283

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

No. NOC 1005/(836/2005) SE-1
School Education and Sports Department
Mantralaya annexe, Mumbai 400 032
Dated :- 16/6/2011

To,
The Secretary,
Central Board of Secondary Education,
Siksha Kendra,2, Community Centre,
Preet Vihar, Vikas Marg,
New Delhi 110 092.

**Subject :** Issue of No Objection Certificate

Sir,

Government of Maharashtra has No Objection for starting a school in C.B.S.E. At. Takve Village, Taluka Maval, Dist. Pune run by Aishabai & Haji Abdul Latif Charitable Trust, Nirnal Bldg., 21st Floor, Nariman Point, Mumbai -400 021 affiliate to **Central Board of Secondary Education** on the condition that the school shall abide by the rules and regulations stipulated in that behalf by the Sate Government.

Yours faithfully,

16/6/11
( R. C. Patil )
Under Secretary to Government

Copy to :
1 The Director, (Primary/Secondary and Higher secondary) Maharashtra State, Pune
2 The Deputy Director of Education, Pune
3. Education Officer, (Primary / Secondary) Zilla Parishad, Pune
4. Manging Trustee, Aishabai & Haji Abdul Latif Charitable Trust, Nirnal Bldg., 21st Floor, Nariman Point, Mumbai -400 021
5. SF SE-1

Scanned with OKEN Scanner